सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६)

# महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**(Maharashtra Act No. XXVI of 2013)**

# Maharashtra Groundwater (Development and Management) Act, 2009

**(As modified up to the 26th January, 2016)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : ३३ रुपये ]

वि (जे) ६६२

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६

# महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

### प्रकरण एक

### प्रारंभिक


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | १ |


### प्रकरण दोन

### राज्य भूजल प्राधिकरण व त्याचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये


| | | | |
|---|---|---|---|
| ३. | राज्य भूजल प्राधिकरण. | .. | ५ |
| ४. | भूजलाचा विकास व व्यवस्थापन यांचे नियमन करण्यासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीचे अधिकार. | .. | ६ |
| ५. | निरधिसूचित क्षेत्रांची अधिकारिता. | .. | ६ |
| ६. | पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण. | .. | ६ |
| ७. | राज्यातील विहीर मालकांची नोंदणी करणे. | .. | ६ |
| ८. | खोल विहिरी खोदण्यास, अस्तित्वात असलेल्या खोल विहिरीतून भूजल काढण्यास प्रतिबंध व उपकर बसविण्याची तरतूद करणे. | | ७ |
| ९. | भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करण्याकरिता पावसाचे पाणी साठवणे. | .. | ७ |
| १०. | भूजल वापर योजना व पीक योजना. | .. | ८ |
| ११. | प्रतिबंधक उपाययोजनांसाठी मार्गदर्शक तत्त्वे. | .. | ९ |
| १२. | खोदकाम अभिकरणांची नोंदणी. | .. | ९ |
| १३. | विहिरींकरिता सुरक्षा उपाययोजना. | .. | ९ |
| १४. | राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये यांचे प्रत्यायोजन. | .. | ९ |
| १५. | अधिकार प्रदान समिती. | .. | ९ |
| १६. | राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद. | .. | १० |


### प्रकरण तीन

### जिल्हा प्राधिकरण त्यांचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये


| | | | |
|---|---|---|---|
| १७. | जिल्हा प्राधिकरण. | .. | १० |
| १८. | जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती करणे. | .. | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे. | .. | १० |
| २०. | सार्वजनिक पिण्याचे पाणी स्रोत अधिसूचित करण्याचा अधिकार. | .. | १० |
| २१. | विवक्षित हद्दीमध्ये प्रभाव क्षेत्रासाठी आणि विहिरी बांधण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिसूचना. | | १० |
| २२. | एका विविक्षित कालावधीसाठी विद्यमान विहिरीमधून पाणी काढण्यास प्रतिबंध. | .. | ११ |
| २३. | दूषित होण्यापासून पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण. | .. | ११ |
| २४. | पंचायतीने जिल्हा प्राधिकरणास मदत करणे. | .. | ११ |


**प्रकरण चार**

**पाणी टंचाई क्षेत्र घोषित करणे आणि पाणी टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करणे**


| | | | |
|---|---|---|---|
| २५. | पाणीटंचाई क्षेत्र घोषित करणे. | .. | १२ |
| २६. | पाणीटंचाई क्षेत्रामध्ये विहिरींमधून पाणी काढण्यासाठी विनियमन. | .. | १२ |
| २७. | नुकसानभरपाई देणे. | .. | १२ |
| २८. | जिल्हा प्राधिकरणाचे चौकशी करण्याचे किंवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे किंवा ते अमलात आणण्याचे अधिकार. | | १२ |


**प्रकरण पाच**

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये**


| | | | |
|---|---|---|---|
| २९. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची स्थापना, रचना व तिचे विधिसंस्थापन. | .. | १४ |
| ३०. | भूजलाच्या विद्यमान वापरकर्त्यांसाठी भूजल व्यवस्थापन. | .. | १५ |
| ३१. | रासायनिक खते किंवा कीटकनाशके इत्यादींच्या वापरास प्रतिबंध करणे किंवा मर्यादा घालणे. | | १५ |
| ३२. | अधिसूचित क्षेत्रांमध्ये नवीन विहिरीचे बांधकाम. | .. | १५ |
| ३३. | सामूहिक सहभागाला चालना देणे. | .. | १६ |
| ३४. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्तीच्या समितीच्या निर्णयांची व योजनांची अंमलबजावणी. | .. | १६ |
| ३५. | वाळू खाणकामाचे विनियमन किंवा प्रतिबंध. | .. | १६ |
| ३६. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकरिता वित्तीय स्रोत. | .. | १६ |
| ३७. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या कामामधील पारदर्शकता. | .. | १६ |

### प्रकरण सहा

### लेखे व लेखापरीक्षा

३८. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला अनुदान व आगाऊ रकमा देणे. .. १७

३९. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अंदाजपत्रक. .. १७

४०. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे लेखे. .. १७

### प्रकरण सात

### भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, तिचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

४१. मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे, त्यांचा आराखडा तयार करणे आणि त्याची घोषणा तयार करणे. १७

४२. प्रभाव क्षेत्राचा आराखडा तयार करणे. .. १७

४३. पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर यांवर आधारित भूजल वापर योजना. .. १८

४४. एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करण्यामध्ये साहाय्य.. १८

४५. तंत्रविषयक सर्वेक्षण व मदत कार्य. .. १८

४६. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील पंचायत, पंचायत समिती व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना सल्ला देणे. १८

### प्रकरण आठ

### संकीर्ण

४७. आदेश बजावणे. .. १९

४८. शासनाने निदेश देणे. .. १९

४९. राज्य प्राधिकरण व पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती यांचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असणे. १९

५०. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. .. १९

५१. नुकसानभरपाईचा दावा करण्यास मनाई. .. १९

५२. अपराध व शास्ती. .. १९

५३. कंपन्यांनी केलेले अपराध. .. २०

५४. अपराध आपसात मिटविणे. .. २०

५५. अपराधांची दखल व न्याय चौकशी. .. २०

५६. अपिले. .. २१

५७. नियम करण्याचा शासनाचा अधिकार. .. २१

५८. अडचणी दूर करण्याचा अधिकार. .. २१

५९. निरसन व व्यावृत्ती. .. २२

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६

# महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

### प्रकरण एक

### प्रारंभिक


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | १ |


### प्रकरण दोन

### राज्य भूजल प्राधिकरण व त्याचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये


| | | | |
|---|---|---|---|
| ३. | राज्य भूजल प्राधिकरण. | .. | ५ |
| ४. | भूजलाचा विकास व व्यवस्थापन यांचे नियमन करण्यासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीचे अधिकार. | .. | ६ |
| ५. | निरधिसूचित क्षेत्रांची अधिकारिता. | .. | ६ |
| ६. | पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण. | .. | ६ |
| ७. | राज्यातील विहीर मालकांची नोंदणी करणे. | .. | ६ |
| ८. | खोल विहिरी खोदण्यास, अस्तित्वात असलेल्या खोल विहिरीतून भूजल काढण्यास प्रतिबंध व उपकर बसविण्याची तरतूद करणे. | | ७ |
| ९. | भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करण्याकरिता पावसाचे पाणी साठवणे. | .. | ७ |
| १०. | भूजल वापर योजना व पीक योजना. | .. | ८ |
| ११. | प्रतिबंधक उपाययोजनांसाठी मार्गदर्शक तत्त्वे. | .. | ९ |
| १२. | खोदकाम अभिकरणांची नोंदणी. | .. | ९ |
| १३. | विहिरींकरिता सुरक्षा उपाययोजना. | .. | ९ |
| १४. | राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये यांचे प्रत्यायोजन. | .. | ९ |
| १५. | अधिकार प्रदान समिती. | .. | ९ |
| १६. | राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद. | .. | १० |


### प्रकरण तीन

### जिल्हा प्राधिकरण त्यांचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये


| | | | |
|---|---|---|---|
| १७. | जिल्हा प्राधिकरण. | .. | १० |
| १८. | जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती करणे. | .. | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे. | .. | १० |
| २०. | सार्वजनिक पिण्याचे पाणी स्रोत अधिसूचित करण्याचा अधिकार. | .. | १० |
| २१. | विवक्षित हद्दीमध्ये प्रभाव क्षेत्रासाठी आणि विहिरी बांधण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिसूचना. | | १० |
| २२. | एका विविक्षित कालावधीसाठी विद्यमान विहिरीमधून पाणी काढण्यास प्रतिबंध. | .. | ११ |
| २३. | दूषित होण्यापासून पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण. | .. | ११ |
| २४. | पंचायतीने जिल्हा प्राधिकरणास मदत करणे. | .. | ११ |


**प्रकरण चार**

**पाणी टंचाई क्षेत्र घोषित करणे आणि पाणी टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करणे**


| | | | |
|---|---|---|---|
| २५. | पाणीटंचाई क्षेत्र घोषित करणे. | .. | १२ |
| २६. | पाणीटंचाई क्षेत्रामध्ये विहिरींमधून पाणी काढण्यासाठी विनियमन. | .. | १२ |
| २७. | नुकसानभरपाई देणे. | .. | १२ |
| २८. | जिल्हा प्राधिकरणाचे चौकशी करण्याचे किंवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे किंवा ते अमलात आणण्याचे अधिकार. | | १२ |


**प्रकरण पाच**

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये**


| | | | |
|---|---|---|---|
| २९. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची स्थापना, रचना व तिचे विधिसंस्थापन. | .. | १४ |
| ३०. | भूजलाच्या विद्यमान वापरकर्त्यांसाठी भूजल व्यवस्थापन. | .. | १५ |
| ३१. | रासायनिक खते किंवा कीटकनाशके इत्यादींच्या वापरास प्रतिबंध करणे किंवा मर्यादा घालणे. | | १५ |
| ३२. | अधिसूचित क्षेत्रांमध्ये नवीन विहिरीचे बांधकाम. | .. | १५ |
| ३३. | सामूहिक सहभागाला चालना देणे. | .. | १६ |
| ३४. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्तीच्या समितीच्या निर्णयांची व योजनांची अंमलबजावणी. | .. | १६ |
| ३५. | वाळू खाणकामाचे विनियमन किंवा प्रतिबंध. | .. | १६ |
| ३६. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकरिता वित्तीय स्रोत. | .. | १६ |
| ३७. | पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या कामामधील पारदर्शकता. | .. | १६ |

## प्रकरण सहा

## लेखे व लेखापरीक्षा


३८. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला अनुदान व आगाऊ रकमा देणे. .. १७

३९. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अंदाजपत्रक. .. १७

४०. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे लेखे. .. १७


## प्रकरण सात

## भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, तिचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये


४१. मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे, त्यांचा आराखडा तयार करणे आणि त्याची घोषणा तयार करणे. १७

४२. प्रभाव क्षेत्राचा आराखडा तयार करणे. .. १७

४३. पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर यांवर आधारित भूजल वापर योजना. .. १८

४४. एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करण्यामध्ये साहाय्य.. १८

४५. तंत्रविषयक सर्वेक्षण व मदत कार्य. .. १८

४६. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील पंचायत, पंचायत समिती व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना सल्ला देणे. १८


## प्रकरण आठ

## संकीर्ण


४७. आदेश बजावणे. .. १९

४८. शासनाने निदेश देणे. .. १९

४९. राज्य प्राधिकरण व पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती यांचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असणे. १९

५०. सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. .. १९

५१. नुकसानभरपाईचा दावा करण्यास मनाई. .. १९

५२. अपराध व शास्ती. .. १९

५३. कंपन्यांनी केलेले अपराध. .. २०

५४. अपराध आपसात मिटविणे. .. २०

५५. अपराधांची दखल व न्याय चौकशी. .. २०

५६. अपिले. .. २१

५७. नियम करण्याचा शासनाचा अधिकार. .. २१

५८. अडचणी दूर करण्याचा अधिकार. .. २१

५९. निरसन व व्यावृत्ती. .. २२

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६

## महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

[ मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ३ डिसेंबर २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. ]

**पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलांच्या समुपयोजनांचे सामूहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींची तरतूद करणे यांसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामूहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित आणि आनुषंगिक बाबींची तरतूद करणे यांसाठी एक कायदा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेत:--

प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. (१) या अधिनियमात, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(एक) "जलप्रस्तर" याचा अर्थ, जमिनीच्या पृष्ठाखाली साठलेल्या पाण्यासह भूशास्त्रीय रचना, असा आहे;

(दोन) "प्रभाव क्षेत्र" याचा अर्थ, भूजल किंवा दाब पृष्ठ समोच्च रेखांमध्ये उपशामुळे बदल होतो-ज्यात जलक्षेपी न्यूनदाब किंवा प्रतिमार्ग क्षेत्राचा अंतर्भाव होतो-असे जमिनीखालील संपूर्ण क्षेत्र, असा आहे;

(तीन) "भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण" याचा अर्थ, पुन:पूर्तीच्या नैसर्गिक स्थितीनुसार पुनर्भरणापेक्षा अधिक, भूजल जलाशयामध्ये वाढ होते अशी प्रक्रिया, असा आहे;

(चार) "खोल विहीर" याचा अर्थ, यंत्राद्वारे केलेला बहुधा उभा खड्डा किंवा विवर असा आहे, यामुळे झरा, अपेक्षित थर, पोकळी, खडक अथवा माती यांचे भंग किंवा जोडण्या यांच्या अंतर्भागामधून भूजल

मिळते आणि यात सामान्यपणे साठ मीटरची किंवा अधिक खोलाची ज्यात एक अथवा अधिक जलप्रस्तर असेल अशी विंधणविहीर, नलिकाकूप यांचा समावेश होतो;

(पाच) "जिल्हा प्राधिकरण" याचा अर्थ, कलम १७ अन्वये नियुक्त केलेले प्राधिकरण, असा आहे;

(सहा) "जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती" याचा अर्थ, कलम १८ अन्वये घटित केलेली जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती, असा आहे;

(सात) पाण्याच्या उपयोगासंबंधात "पिण्याच्या पाण्याचे प्रयोजन" याचा अर्थ, लोकांनी पिण्यासाठी व स्वयंपाक, स्नान, धुणे, सफाई यांसाठी आणि इतर दैनंदिन कामे यांसारख्या इतर घरगुती प्रयोजनांसाठी केलेला पाण्याचा वापर व यामध्ये पशुधनासाठी अशाच संबद्ध प्रयोजनांकरिता केलेल्या पाण्याच्या वापराचा समावेश होतो;

(आठ) "अधिकार प्रदान समिती" याचा अर्थ, कलम १५ अन्वये विनिर्दिष्ट केलेली अधिकार प्रदान समिती, असा आहे;

(नऊ) "तज्ज्ञ मंडळे" याचा अर्थ, भूजल क्षेत्रामध्ये काम करीत असलेल्या केंद्र किंवा राज्य शासन अथवा राज्य प्राधिकरण यांनी अधिस्वीकृती दिलेल्या केंद्र किंवा राज्य शासकीय संघटना, संस्था वा अभिकरणे आणि खाजगी क्षेत्र व अशासकीय संघटना, असा आहे;

(दहा) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(अकरा) "भूजल" याचा अर्थ, संपृक्ति मंडलामधील जमिनीच्या पृष्ठभागाखालील जलप्रस्तरामध्ये असलेले पाणी, असा आहे; आणि हे पाणी विहिरी, विंधणविहिरी, नलिकाकूप किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून काढून घेता येईल अथवा झरा उगम पावेल आणि नाले व नदी यांमध्ये मूळ प्रवाह म्हणून प्रवाहित होईल;

( बारा ) "भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा" याचा अर्थ, शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, असा आहे;

( तेरा ) "जल वर्ष" याचा अर्थ, प्रत्येक वर्षाच्या दिनांक १ जूनपासून सुरू होणारे आणि लगतनंतरच्या वर्षात दिनांक ३१ मे रोजी संपणारे वर्ष, असा आहे;

( चौदा ) "एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना" याचा अर्थ, कलम ९ च्या पोट-कलम (२) अन्वये तयार केलेली एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना, असा आहे;

( पंधरा ) "अधिसूचित नसलेली क्षेत्रे" याचा अर्थ, अधिसूचित क्षेत्रांव्यतिरिक्तची क्षेत्रे, असा आहे;

( सोळा ) "अधिसूचित क्षेत्रे" याचा अर्थ, केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित करण्यात येणाऱ्या भूजल अंदाजानुसार अति समुपयोजन किंवा पाण्याचे दुर्भिक्ष्य किंवा पाण्याचा दर्जा यामुळे बाधित असलेले पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर अथवा असा कोणताही प्रवर्ग याचा समावेश असलेली क्षेत्रे, असा आहे; जी क्षेत्रे कलम ४ मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेला अनुसरून भूजल काढण्याचे विनियमन करण्याकरिता राज्य प्राधिकरणाद्वारे अधिसूचित केले असतील;

( सतरा ) "पंचायत" याचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये स्थापन करण्यात आलेली किंवा स्थापन केली असल्याचे मानण्यात आलेली पंचायत, असा आहे; **१९५९ चा मुंबई ३.**

( अठरा ) "पंचायत समिती" याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित करण्यात आलेली पंचायत समिती, असा आहे; १९६२ चा महा. ५.

( एकोणीस ) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

( वीस ) "सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत" याचा अर्थ, ज्यातून राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे अन्य प्राधिकरण, लोकांना पाण्याचा पुरवठा करीत असेल अशी विहीर असा आहे आणि यामध्ये अशी विहीर, विंधण विहीर, नलिकाकूप किंवा जिल्हा प्राधिकरण अधिसूचित करील असे अन्य कोणतेही पिण्याच्या पाण्याचे स्रोत, यांचा समावेश होतो;

(एकवीस) "सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणा" याचा अर्थ, ज्याद्वारे पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी पाण्याचा पुरवठा करण्यात येतो अशी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताशी संबंधित असलेली बांधकामे व यात जलवाहिन्या, साठवण जलाशय, नळखांब, टाक्या, हातपंप, विजेवर चालणारे पंप व त्यांच्याशी संबंधित इतर सर्व सामग्री यांचा समावेश होतो;

( बावीस ) "पावसाचे पाणी साठवण" याचा अर्थ, पृष्ठभागावर किंवा भूपृष्ठाखालील जलप्रस्तरामध्ये किंवा इतर संरचनेमध्ये पावसाचे पाणी गोळा करण्याचे आणि साठवण्याचे तंत्र, असा आहे;

( तेवीस ) "पुनर्भरण योग्य क्षेत्र" याचा अर्थ, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी रेखन केल्याप्रमाणे, भूजलाचे पुनर्भरण आणि साठवण करण्याकरिता अनुकूल क्षेत्र, असा आहे;

( चोवीस ) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमांन्वये करण्यात आलेले नियम, असा आहे;

( पंचवीस ) "वालुका खाणकाम" याचा अर्थ, नदी, नाले, सरोवर इत्यादींसह किनाऱ्यालगतच्या प्रदेशामधून तसेच समुद्रतटीय क्षेत्रांमधून वाळू काढण्याची किंवा उपसण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया, असा आहे;

( सव्वीस ) एखाद्या विहिरीच्या संबंधात "खोदणे" या शब्दामध्ये त्याच्या सर्व व्याकरणिक फेरफारांसह व सजातीय शब्दप्रयोगांसह एखाद्या नवीन विहिरीचे किंवा अस्तित्वात असलेल्या विहिरीचे खोदकाम, वेधन किंवा विंधण किंवा अस्तित्वात असलेल्या विहिरींची खोली वाढविणे आणि अरीय व चबुतरा यांमध्ये फेरबदल करणे, असा आहे;

( सत्तावीस ) "क्षेत्राचे हितसंबंधित" याचा अर्थ, भूजलाचे आणि त्याच्या उपयोगाचे नियोजन, विकास, विनियमन आणि व्यवस्थापन यांच्याशी संबंधित प्राधिकरणे, निकाय संस्था आणि व्यक्ती, असा आहे;

( अठ्ठावीस ) "राज्य प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले राज्य भूजल प्राधिकरण, असा आहे;

( एकोणतीस ) "राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद" याचा अर्थ, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ याच्या कलम १६ अन्वये घटित करण्यात आलेली राज्य जल परिषद, असा आहे; २००५ चा महा. १८.

( तीस ) "तलाठी" याचा अर्थ, ग्रामपातळीवरील किंवा गावांच्या गटाचा महसूल कर्मचारी, असा आहे;

( एकतीस ) "नागरी स्थानिक संस्था" याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित करण्यात आलेली परिषद आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अथवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यांअन्वये गठित करण्यात आलेली महानगरपालिका, असा आहे;

**१९६५ चा महा. ४०.**

**१८८८ चा मुंबई ३.**

**१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.**

**१९४९ चा मुंबई ५९.**

( बत्तीस ) "भूजलाचा वापरकर्ता" याचा अर्थ, जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती किंवा कंपनी किंवा आस्थापना--मग ती शासकीय असो किंवा अशासकीय असो- पाणी वापर संस्था, भूजल वापर संस्था, औद्योगिक पाणी वापर संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० खालील नोंदणीकृत सहकारी संस्था, पंचायत, मोठ्या प्रमाणातील खाजगी वापरकर्ते, सार्वजनिक नोंदणीकृत मंडळे इत्यादी किंवा इतर कोणत्याही समूहाचे गट यांसह ज्या संस्था घरगुती, औद्योगिक किंवा कृषिविषयक प्रयोजनांसह, कोणत्याही प्रयोजनांसाठी भूजल काढून घेत असेल व त्याचा वापर करीत असेल किंवा त्याची विक्री करीत असेल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती किंवा संस्था तसेच कंपनी वा आस्थापना, असा आहे;

**१९६१ चा महा. २४.**

( तेहतीस ) "पाणी टंचाई क्षेत्र" याचा अर्थ, जिल्हा प्राधिकरणाने कलम २५ अन्वये असे क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र, असा आहे;

( चौतीस ) "पाणलोट क्षेत्र" याचा अर्थ, या अधिनियमाची प्रयोजने विचारात घेऊन, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने, वेळोवेळी निश्चित केलेले व अधिसूचित केलेले, स्थलाकृती जलविभाजक रेषेच्या आतील परिसिद्ध क्षेत्र, असा आहे;

( पस्तीस ) "पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर यावर आधारलेली भूजल वापर योजना" याचा अर्थ, ज्यात पाणलोट किंवा जलप्रस्तर क्षेत्रातील भूजलाच्या स्थितीचा किंवा पातळीचा निर्देश असेल आणि ज्यात एका जलवर्षामध्ये, क्षेत्राच्या भूजलाचे पुनर्भरण व त्यातून पाणी काढणे अशा दोन्हींचा जल लेखा व जल अंदाजपत्रक याचा समावेश असेल अशी पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती किंवा पंचायत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या तांत्रिक सहाय्याने तयार करण्यात आलेली भूजल योजना, असा आहे;

( छत्तीस ) "जलसंपत्ती अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ असा आहे; **२००५ चा महा. १८.**

( सदतीस ) "पाणी वापर संस्था" याचा अर्थ, कोणत्याही प्रकल्पाच्या, कालव्याच्या किंवा नैसर्गिक प्रवाहाच्या किंवा साठ्यांच्या यंत्रणेच्या भागामधून सिंचन पाण्याच्या वापरकर्त्यांची, प्रतिनिधी असलेली वितरिका स्तरावर किंवा त्यावरील स्तरावर स्थापन करण्यात आलेली एखादी पाणी वापर संस्था, असा आहे;

( अडतीस ) "पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती" याचा अर्थ, कलम २९ खाली घटित करण्यात आलेली पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, असा आहे;

( एकोणचाळीस ) "विहीर" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, भूजलाचा शोध घेण्यासाठी किंवा ते काढण्यासाठी खोदलेली विहीर, असा आहे आणि यामध्ये भूजलाचे वैज्ञानिक अन्वेषण, समन्वेषण, आवर्धन, संधारण, संरक्षण किंवा व्यवस्थापन करण्याकरिता केंद्र किंवा राज्य शासनाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी केलेले संरचनेचे खोदकाम वगळून, उघडी विहीर, खोदलेली विहीर, विंधण विहीर, खोदलेली-नि-विंधण विहीर, नलिकाकूप, निस्यंदन विहीर, संचायी विहीर, अंतस्सर विहीर, पुनर्भरण विहीर, निष्कास विहीर, किंवा यांपैकी एखाद्याशी संयोग होऊन किंवा कोणतेही बदल होऊन निर्माण झालेली विहीर, असा आहे;

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या करण्यात न आलेले, मात्र राज्यात अंमलात असलेल्या सिंचन किंवा जलसंपत्ती किंवा अन्य संबंधित अधिनियमांत आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

प्रकरण दोन

## राज्य भूजल प्राधिकरण व त्याचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

**राज्य भूजल प्राधिकरण.** **३.** (१) जलसंपत्ती अधिनियम, याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य भूजल प्राधिकरण असेल, जे या अधिनियमान्वये विहित करण्यात येईल त्या रीतीने त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व त्याला नेमून देण्यात येतील अशी कार्ये व कर्तव्ये पार पाडील.

(२) जलसंपत्ती अधिनियमाच्या कलम ४ मधील पोट-कलम (१) च्या खंड (घ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या पाच विशेष निमंत्रितांखेरीज, राज्य प्राधिकरण हे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य प्राधिकरणास सहाय्य करण्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटी व शर्तींवर आणि शासन विहित करील असा संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व भूजल क्षेत्रातील एक तज्ज्ञ व्यक्ती आणि भूजल वापरकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारी एक महिला यांना निमंत्रित करील.

**भूजलाचा विकास व व्यवस्थापन यांचे नियमन करण्यासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीचे अधिकार.**

**४.** (१) राज्य प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडून आलेल्या शिफारशी व भूजलाची वैज्ञानिक गुणवत्ता यांचा व भूजलाचे प्राक्कलन यांवर आधारित केंद्रीय भूजल प्राधिकरणासह भूजल क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकविध संस्थांची मते प्राप्त झाल्यानंतर, आणि पाणलोट व जलप्रस्तर क्षेत्र यांमधून कोणत्याही प्रकारे भूजल काढून घेणे किंवा त्याचा वापर करणे किंवा दोन्ही यांचे नियमन करणे हे, लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे असे वाटत असणाऱ्या क्षेत्राच्या भूजल वापरकर्त्यांच्या मतांची खातरजमा केल्यानंतर असे क्षेत्र त्या विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचित क्षेत्र म्हणून जाहीर करील.

(२) राज्य प्राधिकरण, पोट-कलम (१) अन्वये क्षेत्र अधिसूचित केल्यावर अधिसूचित क्षेत्रातील भूजलाचा विकास व व्यवस्थापन यास चालना देण्याच्या व त्याचे नियमन करण्याच्या हेतूने, या अधिनियमाच्या कलम २९ अन्वये पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती स्थापन करील.

**निरधिसूचित क्षेत्रांची अधिकारिता.**

**५.** राज्य प्राधिकरणास, अधिसूचित क्षेत्रातील भूजलाची उपलब्धता व गुणवत्ता यात वाढ झाल्याचे वाटत असल्यास ते, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचारविनिमय करून व केंद्रीय भूजल प्राधिकरणासह तज्ज्ञ मंडळाची मते घेऊन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे क्षेत्र निरधिसूचित करील.

**पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण.**

**६.** (१) कोणताही भूजल वापरकर्ता हा, भूजलामध्ये कोणतीही गोष्ट करून किंवा कोणताही प्रवाह त्यात सोडून ते, तात्पुरते किंवा कायमस्वरूपी दूषित करणार नाही.

(२) राज्य प्राधिकरण हे, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व जिल्हा प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून राज्यातील अधिसूचित व अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण व परिरक्षण करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करील.

(३) राज्य प्राधिकरण हे, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे व पुनर्भरण योग्य क्षेत्रांचे संरक्षण करण्यासाठीच्या उपाययोजनांसह, राज्यात अस्तित्वात असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्रोतांच्या भूजलाच्या गुणवत्तेचे संरक्षण व परिरक्षण करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा आवश्यक उपाय योजना करील.

(४) अशा उपाय योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेला निधी हा, राज्य शासन, राज्य प्राधिकरणाला उबलब्ध करून देईल.

(५) राज्य प्राधिकरण हे, ग्रामीण किंवा नागरी स्थानिक मंडळांसह, भूजल प्रदूषित करणाऱ्यांना भूजल स्रोत प्रदूषित करण्यापासून परावृत्त करील व भूजल प्रदूषित करण्यात आल्यामुळे, विहित मानकांनी पाण्याची गुणवत्ता पूर्ववत करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा पाणी प्रदूषित करणाऱ्यांच्या खर्चाने, विहित दर्जानुसार, उपाययोजना करील.

**राज्यातील विहीर मालकांची नोंदणी करणे.**

**७.** राज्य प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा पद्धतीने, राज्यातील अधिसूचित व अधिसूचित नसेल अशा दोन्ही क्षेत्रांतील विहिरींच्या सर्व मालकांची नोंदणी झाल्याविषयीची खातरजमा करील.

**खोल विहिरी खोदण्यास, अस्तित्वात असलेल्या खोल विहिरीतून भूजल काढण्यास प्रतिबंध व उपकर बसविण्याची तरतूद करणे.**

८. (१) राज्य प्राधिकरण, कृषी किंवा औद्योगिक वापरासाठी अधिसूचित आणि अधिसूचित नसलेल्या क्षेत्राच्या आत खोल विहिरी खोदण्यास प्रतिबंध करील :

परंतु, राज्य प्राधिकरणास, कारणे लेखी नमूद करून व विहित रीतीने, कोणत्याही व्यक्तीस किंवा भूजल वापरकर्त्यास, पिण्याच्या पाण्यासाठी अधिसूचित किंवा अधिसूचित नसलेल्या क्षेत्राच्या आत कोणतीही खोल विहीर खोदण्यास, विनिर्दिष्ट परवानगी देता येईल.

(२) राज्य प्राधिकरण, अधिसूचित क्षेत्राच्या आत कोणत्याही कारणाने, खोल विहिरींसहित अन्य विहिरींचे बांधकाम करण्यावर पूर्णपणे बंदी घालून त्याचे विनियमन करील.

(३) राज्य प्राधिकरणाच्या सल्ल्यावरून, राज्य शासन अधिसूचित नसलेल्या क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या खोल विहिरींचा वापर करण्यावर, विहित करण्यात येईल असा उपकर बसविण्यासाठी, संबंधित प्राधिकरणास अशी मार्गदर्शक तत्त्वे देईल:

परंतु, बसविण्यात आलेल्या उपकराचे उत्पन्न, संबंधित प्राधिकरण, पंचायत किंवा यथास्थिति, नागरी स्थानिक संस्था यांच्याकडे पाठवील आणि त्याचा वापर भूजल संधारण कार्यक्रम राबविण्यासाठी करण्यात येईल.

(४) राज्य प्राधिकरण, अधिसूचित क्षेत्रात साठ मीटर किंवा त्याहून अधिक खोल असलेल्या खोल विहिरींमधून पंपाच्या सहाय्याने भूजल काढून घेण्यावर पूर्ण मनाई करण्याचा जिल्हा प्राधिकरणाला निदेश देईल. अधिसूचित क्षेत्रातील खोल विहिरींचे वापरकर्ते, कलम १० अन्वये तयार करण्यात आलेल्या भूजल वापर योजना व पीक योजना यांचे अनुसरण करतील. राज्य शासन, अशा वापरकर्त्यांकडून या योजना अधिसूचित होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत समुचित उपकर वसूल करील. जिल्हा प्राधिकरण, विहित करण्यात आलेल्या रीतीने कार्यान्वयन होत असल्याची सुनिश्चिती करील.

(५) कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही भूजल वापरकर्ता, विहित करण्यात येईल अशा रीतीने, जिल्हा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज अधिसूचित क्षेत्राच्या आतील भूजलाची विक्री करणार नाही.

**भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करण्याकरिता पावसाचे पाणी साठवणे.**

९. (१) राज्य प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व केंद्रीय भूजल मंडळ यांच्याशी विचारविनिमय करून, राज्यातील पुनर्भरणपात्र क्षेत्रांचा शोध घेईल आणि भूजलाचे पुनर्भरण करण्यासाठी पावसाचे पाणी साठवण्याकरिता आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करील.

(२) राज्य प्राधिकरण, प्राथम्याने अधिसूचित क्षेत्रे व अधिसूचित नसलेल्या क्षेत्रांकरिता भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणाकरिता एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करण्याकरिता पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, पंचायत व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याशी विचारविनिमय करून जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समितीला निदेश देईल. ही योजना राज्याच्या उप-खोरे व खोरेनिहाय जलयोजनेचा एक भाग असेल.

(३) राज्य शासन व राज्य प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व पंचायती यांच्याशी विचारविनिमय करून एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी झाली असल्याची खात्री करील. राज्य शासन, प्राथम्याने अधिसूचित क्षेत्रांमध्ये भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणाकरिता एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी करेल. या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेली जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती, योजनेची विहित रीतीने अंमलबजावणी झाली असल्याचे संनियंत्रण करील.

(४) अशा उपाययोजना राबविण्यासाठी आवश्यक असलेला निधी हा राज्य शासन राज्य प्राधिकरणाला उपलब्ध करून देईल.

(५) राज्य प्राधिकरण, सामूहिक सहभागाद्वारे भूजल पुनर्भरण सुकर करण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापनातील हितसंबंधितांच्या कामाबाबतही खात्री करील.

(६) राज्य प्राधिकरण, विहित केल्याप्रमाणे, जास्त पाणी लागणारी पिके घेण्याकरिता भूजलाचा वापर करण्याऱ्यांना प्रोत्साहन न देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करील.

(७) अधिसूचित क्षेत्रात येणाऱ्या नागरी क्षेत्रात, निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक आणि शंभर चौरस मीटर किंवा त्याहून अधिक परिक्षेत्रामध्ये अनुकूल व तांत्रिकदृष्ट्या योग्य पावसाचे पाणी साठविण्याच्या यंत्रणेची बांधकामे करारनिर्विष्ट कालावधीत बांधण्याची खात्री करून घेण्यासाठी राज्य प्राधिकरण संबंधित प्राधिकरणांना किंवा नागरी स्थानिक संस्थांना निदेश देईल. यात कसूर झाल्यास, अशा प्रकारे पावसाचे पाणी साठविण्याच्या यंत्रणेचे बांधकाम नागरी संस्था करू शकेल आणि भोगवटादारांकडून विहित रीतीने, शास्तीसह त्यात अंतर्भूत असलेला खर्च वसूल करील.

(८) संबंद्ध कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, नागरी स्थानिक संस्था किंवा यथास्थिति, इतर कोणतेही स्थानिक प्राधिकरण शंभर चौरस मीटर किंवा त्याहून अधिक क्षेत्र असलेल्या इमारतीच्या आराखड्यात छपरावर पावसाचे पाणी साठविण्याच्या यंत्रणेचे बांधकाम करण्याची तरतूद करण्याकरिता आवश्यक त्या शर्ती लादू शकेल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने याबाबतीत दिलेल्या निदेशांचे अनुपालन केल्यानंतरच बांधकामाला व कायमस्वरूपी पाणी व वीज जोडणी यांना मान्यता देण्यात येईल.

(९) राज्य प्राधिकरण स्वत: किंवा इतर अभिकरणामार्फत, पावसाचे पाणी साठविण्याची यंत्रणा आणि भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण यासाठी पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व हितसंबंधित यांच्यावतीने, राज्य अभिकरणे, अशासकीय संघटना, स्वयंसेवी संघटना, शैक्षणिक संस्था, उद्योग किंवा व्यक्ती यांमार्फत सामूहिक जागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाला चालना देण्याकरिता पावले उचलील.

(१०) राज्य प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, गाव, स्थानिक समाज किंवा अशासकीय संघटना यांनी अंमलबजावणी केलेल्या उत्तम प्रथांना, नवनवीन कार्यक्रमांना विहित केलेल्या रीतीनुसार राज्य शासनामार्फत काही प्रोत्साहने देऊन त्याद्वारे त्यांना उत्तेजन वा आणखी प्रोत्साहन देऊ शकेल.

**भूजल वापर योजना व पीक योजना.**

**१०.** (१) राज्य प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार, राज्य शासन, विहित करण्यात येईल अशा रीतीने जिल्हा प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व पंचायत यांच्याशी विचारविनिमय करून संबंधित शासकीय प्राधिकरणांना अधिसूचित क्षेत्रातील भूजल वापर योजनेवर आधारित भविष्यलक्षी पीक योजना तयार करण्यासाठी निदेश देईल.

ही योजना सर्व हितसंबंधितांना बंधनकारक असेल आणि योजनेचे अनुपालन न करणे हा या अधिनियमान्वये दखलपात्र अपराध मानण्यात येईल.

(२) राज्य शासन, राज्य प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार कमी पाणी लागणाऱ्या पिकांकरिता आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करणे आणि दुवा जोडणी यासाठी संबंधित शासकीय प्राधिकरणांना निदेश देईल.

(३) राज्य प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर क्षेत्रनिहाय भूजल वापर योजना व पीक योजना यांच्या शिफारशींच्या आधारे अधिसूचित क्षेत्रांतील जास्त पाणी लागणाऱ्या पिकांवर संपूर्ण मनाई जाहीर करील:

परंतु, अशा क्षेत्रातील कोणताही भूजल वापरकर्ता विहित करण्यात येईल अशा रीतीने अशी जास्त पाणी लागणाऱ्या पिकांच्या लागवडीची परवानगी घेण्याकरिता पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकडे जाईल. अशा क्षेत्रातील कोणत्याही भूजल वापरकर्त्याद्वारे अशा जास्त पाणी लागणाऱ्या पिकांच्या लागवडीकरिता विनंती प्राप्त झाल्यावर पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती अर्जदाराने अशा पिकांच्या लागवडीसाठी भूजलाचा कमीतकमी वापर करावा आणि तसेच, गावाच्या जल अंदाजपत्रक ठेवण्यात येईल अशा जलसंधारण उपाययोजना स्वखर्चाने कराव्यात या शर्तीवर अशा पिकांच्या लागवडीसाठी केलेली विनंती मान्य करून शकेल.

**प्रतिबंधक उपाय-योजनांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.**

**११.** राज्य प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेशी विचारविनिमय करून, अधिसूचित नसलेल्या क्षेत्रात पाणलोट क्षेत्र व जलप्रस्तर यांवर आधारित भूजल वापर योजनेची अंमलबजावणी करण्यासंबंधात शासकीय प्राधिकरणांना आवश्यक ती मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करील. राज्य प्राधिकरण अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या वा दूषित होण्याची शक्यता असलेल्या क्षेत्रांना प्राधान्य देईल आणि उपलब्ध जलसंपत्ती व पाणलोट क्षेत्रनिहाय भूजल वापर योजनेनुसार योग्य ती पीकपद्धती स्वीकारण्याकरिता प्रोत्साहन देण्यासाठीदेखील निदेश देईल.

**खोदकाम अभिकरणांची नोंदणी.**

**१२.** राज्य प्राधिकरण, अशा अटी व शर्तीवर व विहित करण्यात येईल अशा रीतीने भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेसह राज्यातील खोदकाम यंत्रसामग्री मालक व ते चालविणारे यांच्या सक्तीच्या नोंदणीचे संनियंत्रण करील.

**विहिरींकरिता सुरक्षा उपाययोजना.**

**१३.** राज्य प्राधिकरण, विहिरींच्या सुरक्षेकरिता समुचित सावधगिरीच्या उपाय योजना हाती घेण्याकरिता संबंधित शासकीय प्राधिकरणांना मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करील. क्षेत्रातील पंचायत व नागरी स्थानिक संस्था त्यांचे सनियंत्रण करतील.

**राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये यांचे प्रत्यायोजन.**

**१४.** राज्य प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, ज्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा किंवा कर्तव्यांचा या अधिनियमान्वये वापर करता येईल किंवा त्यांचे पालन करता येईल ते अधिकार व कर्तव्ये, राज्य प्राधिकरणाने याबाबतीत काढलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी परिस्थिती व अशी स्थिती असल्यास अशा परिस्थितीत व अशा स्थितीत आदेशाद्वारे, याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या राज्य प्राधिकरणाचे, जिल्हा प्राधिकरणाचे, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे वा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे कोणतेही कर्मचारी यांना वापर करता येतील किंवा त्यांचे पालन करता येईल.

**अधिकार प्रदान समिती.**

**१५.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, जलसंपत्ती अधिनियमाच्या कलम १५ अन्वये घटित झालेले राज्य जल मंडळ हे, अधिकार प्रदान समिती असेल.

(२) अधिकार प्रदान समिती, संपूर्ण राज्याकरिता एकात्मीकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना एकत्रित करील आणि राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषदेकडे तिच्या मान्यतेकरिता सादर करील. ही योजना, हा एकात्मीकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेचा एक भाग असेल.

राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद.

**१६.** (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जलसंपत्ती अधिनियमाच्या कलम १६ अन्वये घटित करण्यात आलेल्या राज्य जल परिषदेकडे, राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषदेची जबाबदारी सोपवील.

(२) राज्य जल परिषद व राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद संपूर्ण राज्याकरिता एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेस मान्यता देईल आणि राज्य जल योजनेशी तिचे एकत्रीकरण झाल्याची खात्री करील.

प्रकरण तीन

## जिल्हा प्राधिकरण त्यांचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

जिल्हा प्राधिकरण.

**१७.** राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अधिसूचनेत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा क्षेत्रातील जिल्हा प्राधिकारी म्हणून, तहसीलदारापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी पदनिर्देशित करील.

जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती करणे.

**१८.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती या नावाची एक जिल्हा समिती घटित करील.

(२) जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समितीमध्ये अध्यक्ष म्हणून जिल्ह्याचा पालकमंत्री यांचा समावेश असेल आणि राज्य शासनाकडून नामनिर्देशित करावयाच्या विधानमंडळाच्या त्या परिसरातील एका सदस्यासह इतर सदस्यांचा, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे समावेश करण्यात येईल. जिल्हाधिकारी हा जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समितीचा सदस्य-सचिव असेल.

(३) जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समितीच्या निर्णयांची विहित करण्यात येईल अशा रीतीने जिल्हा प्राधिकरणाकडून अंमलबजावणी करण्यात येईल.

एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे.

**१९.** जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्राथम्याने, अधिसूचित क्षेत्राकरिता आणि तद्नंतर अधिसूचित नसलेल्या क्षेत्राकरिता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती आणि पंचायत यांच्याशी विचारविनिमय करून, भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करण्याकरिता एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करील.

सार्वजनिक पिण्याचे पाणी स्रोत अधिसूचित करण्याचा अधिकार.

**२०.** जिल्हा प्राधिकरण, आदेशाद्वारे, सार्वजनिक पिण्याचे पाणी स्रोत अधिसूचित करील.

**विवक्षित हद्दीमध्ये प्रभाव क्षेत्रासाठी आणि विहिरी बांधण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिसूचना.**

**२१.** (१) कलम २० अन्वये, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा स्रोत अधिसूचित केल्यानंतर, कोणतीही व्यक्ती, अशा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताच्या पाचशे मीटरच्या अंतरामध्ये, कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही विहिरीचे खोदकाम करणार नाही. जिल्हा प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने पुरविलेल्या माहितीच्या आधारे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताभोवती प्रभाव क्षेत्रदेखील निश्चित करील आणि ते अधिसूचित करील. असे प्रभाव क्षेत्र अधिसूचित केल्यावर, कोणतीही व्यक्ती, अशा प्रभाव क्षेत्रात, कोणत्याही प्रयोजनासाठी, कोणत्याही विहिरीचे खोदकाम करणार नाही:

परंतु, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा स्रोत म्हणून वापर करण्यासाठी राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने, विहिरीचे खोदकाम करण्याकरिता या पोट-कलमांच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही विहिरीचे खोदकाम केल्याच्या परिणामी, जिल्हा प्राधिकरणाकडून अशी विहीर बंद करण्यात येईल किंवा ती सरकारजमा करण्यात येईल. या पोट-कलमान्वये कोणतीही विहीर बंद केल्याबद्दल किंवा ती सरकारजमा केल्याबद्दल कोणतीही भरपाई किंवा नुकसानभरपाई देय असणार नाही आणि अशी कोणतीही विहीर बंद किंवा सरकारजमा करण्यात आल्यामुळे कलम ५२ च्या कोणत्याही तरतुदींना बाध येणार नाही.

**एका विवक्षित कालावधीसाठी विद्यमान विहिरीमधून पाणी काढण्यास प्रतिबंध.**

**२२.** कोणतीही विद्यमान विहीर प्रभाव क्षेत्रामध्ये येत असेल, तर अधिसूचित व अधिसूचित नसलेल्या क्षेत्रामध्ये किंवा प्रभाव क्षेत्राव्यतिरिक्त, अधिसूचित क्षेत्रामध्ये येत असेल त्यामुळे, कोणत्याही सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे आढळून येत असेल तर, जिल्हा प्राधिकरणास, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व पंचायत यांची मते निश्चित करून घेतल्यानंतर, आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या तंत्रविषयक सल्ल्यावरून त्या त्यावेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पावसाचे प्रमाण व स्वरूप आणि तत्संबंधित कोणतेही अन्य घटक लक्षात घेऊन, आणि त्या मालकास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन, आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने, वाजवी कालावधीकरिता अशा विहिरीमधून पाणी काढण्यास मनाई करता येईल.

**दूषित होण्यापासून पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण.**

**२३.** कोणतीही व्यक्ती भूजलाच्या पिण्याच्या पाण्याचा स्रोत दूषित होईल अशी कोणतीही कृती करणार नाही. जिल्हा प्राधिकरण भूजलाच्या पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची गुणवत्ता जतन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करील आणि जेथे कोणत्याही कारणांमुळे पिण्याचे पाण्याचे स्रोत दूषित होत असतील तेथे विहित करण्यात येईल अशा रीतीने, गावांमध्ये भूजल काढणे विनियमित करील.

**पंचायतीने जिल्हा प्राधिकरणास मदत करणे.**

**२४.** या अधिनियमान्वये, पिण्याच्या पाण्याच्या स्रोताचे कायम व्यवस्थापन करण्यामध्ये आणि पाणीटंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करण्यामध्ये पंचायत जिल्हा प्राधिकरणास मदत करील.

प्रकरण चार

## पाणीटंचाई क्षेत्र घोषित करणे आणि पाणी टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षण करणे

**पाणी टंचाई क्षेत्र घोषित करणे.**

**२५.** पावसाळ्याच्या कालावधीत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सल्ल्याचे आधारे, स्वत:हून किंवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती किंवा पंचायत यांच्या विनंतीवरून, पावसाचे प्रमाण व स्वरूप आणि पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीची माहिती किंवा अन्य कोणतीही संबंधित बाब लक्षात घेता जिल्ह्याच्या त्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांमधील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता ही त्या क्षेत्राच्या पशुधन आणि मानवी लोकसंख्येच्या आवश्यकतेपेक्षा कमी आहे असे जिल्हा प्राधिकरणाचे मत असेल तर, किंवा पंचायत व पंचायत समिती यांच्या मागणीनुसार त्यास आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे परंतु एका वेळी एका जलवर्षापेक्षा अधिक नाही अशा कालावधीकरिता आदेशाद्वारे, अशा क्षेत्राला पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करता येईल.

**पाणी टंचाई क्षेत्रामध्ये विहिरींमधून पाणी काढण्यासाठी विनियमन.**

**२६.** कलम २५ अन्वये पाणीटंचाई क्षेत्र घोषित केल्यावर, जिल्हा प्राधिकरणास, अशा पाणीटंचाईच्या काळात, आदेशाद्वारे प्रभाव क्षेत्रामधील किंवा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून एक किलोमीटर अंतरामध्ये, यांपैकी जे अधिक असेल अशा क्षेत्रातील अशी विहीर तात्पुरती बंद करून, भूजल काढण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रीतीने विनियमन करता येईल.

**नुकसान भरपाई देणे.**

**२७.** कलम २६ अन्वये, विहीर तात्पुरती बंद करावी असा आदेश काढण्यात आला असला तरी, जिल्हा प्राधिकरणास, राज्य शासनाच्या संबंधित विभागाशी विचारविनिमय करून, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर आणि असा पुरावा सादर करण्यासाठी मालकास आवश्यक करून, आदेशाच्या वेळी केवळ उभ्या असलेल्या फळबागेच्या फळांचे व झाडांचे बाजारमूल्य विचारात घेऊन जी त्यांच्या बाजारमूल्यापेक्षा कमी नाही, अशी नुकसानभरपाई देण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रीतीने आदेश काढता येईल.

**जिल्हा प्राधिकरणाचे चौकशी करण्याचे किंवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे किंवा ते अंमलात आणण्याचे अधिकार.**

**२८.** (१) जिल्हा प्राधिकरण, सार्वजनिक पिण्याचे पाणी स्त्रोताचे संरक्षण किंवा सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल यांच्याशी संबंधित, या अधिनियमान्वये, जेव्हा-जेव्हा चौकशी करणे आवश्यक असेल किंवा कोणत्याही निर्णयांची अंमलबजावणी करणे किंवा ते अमलात आणणे आवश्यक असेल तेव्हा, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे निर्णय अंमलात आणील. जिल्हा प्राधिकरण किंवा त्याने याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला पूर्वसूचना दिल्यानंतर, पुढील गोष्टी करील,--

(क) सर्वेक्षण करील किंवा त्याची मोजणी करील;

(ख) पंपाची तपासणी करील आणि भूभौतिक सर्वेक्षण करील;

(ग) विहिरीवर जलपातळी आलेखक यंत्र आणि जल प्रमाप यंत्र बसवील आणि त्याची देखभाल करील;

(घ) जमिनीच्या संबंधात तपासणी करण्याच्या आणि कोणतेही मोजमाप करण्याच्या किंवा भूपृष्ठावर किंवा भूमिगत पाण्याच्या ठिकाणाची तपासणी करण्याच्या हक्कासह, शासकीय मालकीसह कोणत्याही मालमत्तेमध्ये प्रवेश करील;

(ङ) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या परवानगीने किंवा परवानगीशिवाय खोदकाम केले असेल किंवा करण्यात येणार असेल अशा विहिरीची तपासणी करील आणि त्यामधून खोदकाम केलेली माती आणि इतर वस्तू यांची आणि अशा मातीचे किंवा इतर वस्तूंच्या नमुन्यांची तपासणी करील किंवा पाण्याचा दर्जा आणि दूषितपणा तपासण्याकरिता अशा विहिरींमधून काढलेल्या पाण्याची तपासणी करील;

(च) विहिरीचे खोदकाम करणाऱ्या व्यक्तीस, जिल्हा प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे काम पूर्ण केले असेल वा सोडले असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीकरिता त्यामधून काढलेल्या मातीच्या किंवा कोणत्याही वस्तूंचे नमुने विहित रीतीने ठेवण्यासाठी व त्यांचे जतन करण्यासाठी लेखी आदेश देईल आणि ती व्यक्ती अशा मागणीचे अनुपालन करील;

(छ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आवश्यक असलेली कोणतीही माहिती मिळविण्यासाठी, संबंधित अभिलेख किंवा दस्तऐवज यांची तपासणी करील आणि त्याच्या प्रती घेईल आणि चौकशी चालवील;

(ज) भूजल वापरकर्त्याला कोणत्याही भूजल प्रत्याहरण संरचनेवर जिल्हा प्राधिकरणाच्या खर्चाने असे मोजमाप यंत्र बसविण्यासाठी आणि पाण्याच्या परिमाणाचे संनियंत्रण करण्यासाठी आदेश देईल;

(झ) अनधिकृत खोदकामाकरिता किंवा बांधकामाकरिता वापरलेली साधनसामग्री किंवा साधने जप्त करील, तसेच अनधिकृत बांधकाम पाडील;

(ञ) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या कोणत्याही भूजल वापरकर्त्याला भूजल काढणे, काम बंद करणे, त्याचा वीजपुरवठा खंडित करणे व या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार कोणतेही जलविषयक काम अवैध असल्याचे आढळल्यास ते सीलबंद करणे, याकरिता निदेश देईल;

(ट) या अधिनियमान्वये, कोणत्याही ठिकाणी अपराध घडला होता किंवा घडत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा ठिकाणी अशा साहाय्यनिशी, कोणतेही असल्यास, आवश्यक असेल तर, प्रवेश करील व तपास करील; आणि तसे केल्याच्या तीस दिवसांच्या आत ज्या व्यक्तीने अपराध केला आहे किंवा करत आहे अशा व्यक्तीला विनिर्दिष्ट कालावधीकरिता त्याने भूजल काढू नये किंवा त्याचा वापर करू नये असा लेखी आदेश काढील;

(ठ) खोदकाम करणे, भूजल काढणे, भूजलाचा वापर करणे व भूजल दूषित करणे अशा गोष्ट होत असतील तर भूजलाच्या कायम विकासास जे हानिकारक ठरत आहे अशा व्यक्तीला प्रवेशद्वार उघडण्यास सांगितले असतानाही तसे करण्यास त्याने नकार दिल्यास कोणत्याही जागेचे प्रवेशद्वार तोडील;

(ड) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा खटल्याची चौकशी करणे व त्याची तपासणी करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यासाठी आवश्यक असल्याप्रमाणे इतर सर्व गोष्टी करील.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी या ज्याप्रमाणे त्या उक्त संहितेच्या कलम ९३ अन्वये काढलेल्या वॉरंट प्राधिकाराखाली कोणत्याही तपासाला व झडतीला लागू होतात त्याचप्रमाणे त्या या कलमान्वये कोणत्याही तपासाला किंवा जप्तीला लागू होतील. **१९७४ चा २.**

(३) जेव्हा जिल्हा प्राधिकरण पोट-कलम (१) च्या खंड (झ) अन्वये कोणतीही यांत्रिक साधनसामग्री किंवा साधन जप्त करील तेव्हा, शक्य तितक्या लवकर त्याबाबत दंडाधिकाऱ्याला कळविण्यात येईल आणि अभिरक्षेबाबतचे त्याचे आदेश घेण्यात येतील.

प्रकरण पाच

## पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची स्थापना, रचना व तिचे विधिसंस्थापन.**

**२९.** (१) राज्य प्राधिकरण या अधिनियमान्वये पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला नेमून दिलेली कार्ये व कर्तव्ये विहित रीतीने पार पाडण्यासाठी अकरा गावांपेक्षा अधिक गावांची क्षेत्रे समाविष्ट असलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची रचना करील.

(२) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीमध्ये पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल:--

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | संबंधित पंचायत समितीचे अध्यक्ष | .. | पदसिद्ध अध्यक्ष; |
| (ख) | प्रत्येक पंचायतीमधून प्रत्येकी एक प्रतिनिधी व ग्राम जल व स्वच्छता समिती किंवा पाणलोट क्षेत्र विकास तंत्रविषयक समितीचे सदस्य जे अधिसूचित क्षेत्रामधील नागरी स्थानिक संस्थेचे सदस्य किंवा शेत किंवा जमिनीमध्ये पाण्याच्या वापराचे नियोजन व जलसंधारण यासंबंधात माहिती व अनुभव असलेली कोणतीही इतर व्यक्ती. | | सदस्य; |
| (ग) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जलसंपदा विभाग, कृषी , पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांमधील उपअभियंत्याच्या दर्जाहून कमी नसलेला प्रत्येकी एक प्रतिनिधी. | | सदस्य; |
| (घ) | अधिसूचित क्षेत्रामधील प्रत्येक पाणी वापर संस्थेमधील प्रत्येक एक प्रतिनिधी. | | सदस्य; |
| (ङ) | संबंधित पंचायत समिती व जिल्हा परिषद यामधील निवडून आलेला सदस्य | | पदसिद्ध सदस्य; |
| (च) | अधिसूचित क्षेत्रामधील जलसंधारणावर काम करीत असलेल्या अशासकीय संस्थेचा किंवा स्वयंसेवी संस्थेचा एक प्रतिनिधी. | | सदस्य निमंत्रित; |
| (छ) | अधिसूचित क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्राचा भाग असलेल्या संबंधित पाणी वापर संस्थेचे प्रतिनिधी | | सदस्य; |
| (ज) | गट विकास अधिकारी | | पदसिद्ध सदस्य सचिव. |

(३) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे किमान एक तृतीयांश सदस्य हे महिला सदस्य असतील.

(४) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या सदस्याचा पदावधी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(५) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या बैठकीला उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक सदस्याला (राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य वगळून) विहित केलेल्या दराने प्रवास व दैनिक भत्ता देण्यात येईल.

(६) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची बैठक वर्षाला प्रत्येक तीन महिन्यांमधून एकदा व आकस्मिक निकडीच्या वेळी जेव्हा आवश्यक असेल तेव्हा घेण्यात येईल. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या बैठकीत अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्याच्याशी पूरक वा साहाय्यभूत सर्व बाबी या विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. तहसीलदार हा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या बैठकीचा निमंत्रक असेल :

परंतु असे की, जर अधिसूचित क्षेत्रामध्ये अकरा गावांपेक्षा कमी गावे असतील तर, राज्य प्राधिकरण अशा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीची कार्ये संबंधित पंचायत किंवा नागरी स्थानिक संस्था यांच्याकडे सोपवील.

**भूजलाच्या विद्यमान वापर कर्त्यांसाठी भूजल व्यवस्थापन.**

**३०.** (१) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती ही भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या तांत्रिक साहाय्याने पाणलोट क्षेत्र वा जलप्रस्तर यावर आधारित भूजल वापर योजना तयार करील आणि जिल्हा प्राधिकरण विहित करण्यात येईल अशा रीतीने ती अधिसूचित करील.

(२) पाऊस व जलवर्षातील भूजलाची पातळी याआधारे पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती ही दरवर्षी पाणलोट क्षेत्र वा जलप्रस्तर यावर आधारित भूजल वापर योजनेचे अद्ययावतीकरण करील आणि त्यानुसार भूजल काढण्यावर संनियंत्रण करील व तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची अखंड सुरक्षितता राखील. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती ही भूजलाचे विनियमन करण्यासाठी करावयाच्या उपायांची शिफारस, जिल्हा प्राधिकरणाला करील. ते, राज्य शासन, पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था यांना त्या क्षेत्रामध्ये भूजल साधनसंपत्ती वाढविण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करील.

(३) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती ही राज्य शासनाबरोबरच एकात्मीकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना राबविण्यासाठी पाठपुरावा करील.

(४) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती ही भूजलाचे विद्यमान वापरकर्ते व विहिरींचे मालक यांना विहित करण्यात येईल अशा रीतीने भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करण्याकरिता वैयक्तिक उपाययोजना राबविण्याबाबत खात्री करील.

(५) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती जल अंदाजपत्रकावर आधारित पीक पद्धती विनिर्दिष्ट करील आणि घरगुती, शेती, उद्योग यांच्या वापरासाठी किंवा अन्य कोणत्याही वापरासाठी विद्यमान विहिरींमधून आवश्यक तेवढे भूजल काढण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, भूजल वापर योजनेवर आधारित, योजना तयार करील.

**रासायनिक खते किंवा कीटकनाशके इत्यादींच्या वापरास प्रतिबंध करणे किंवा मर्यादा घालणे.**

**३१.** (१) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, रासायनिक खतांच्या किंवा कीटकनाशकांच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, तो पुरणे किंवा त्याचे अंत:क्षेपण करणे, औद्योगिक निस्सारण करणे यांसाठी विनियमन करण्याची आणि भूजलाच्या दर्जाचे संरक्षण करण्याची जिल्हा प्राधिकरणाकडे शिफारस करील.

(२) जिल्हा प्राधिकरण, वस्तुस्थिती लक्षात घेतल्यानंतर अशा शिफारशीवर, संबंधित शासकीय प्राधिकरणांच्या पंचायतीच्या, पंचायत समितीच्या किंवा नागरी स्थानिक संस्थेच्या साहाय्याने आवश्यक ती उपाययोजना करील.

**अधिसूचित क्षेत्रामध्ये नवीन विहिरींचे बांधकाम.**

**३२.** (१) कोणतेही व्यक्ती, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या पूर्वपरवानगीशिवाय अधिसूचित क्षेत्रामध्ये विहिरीचे खोदकाम करणार नाही. अशी व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा नमुन्यात पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकडे अर्ज करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, तो अर्ज शिफारशींकरिता भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे विचारार्थ पाठवील आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या शिफारशींच्या आधारे, परवानगी देण्याचा किंवा फेटाळण्याचा निर्णय घेईल :

परंतु, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज कोणतीही परवानगी फेटाळण्यात येणार नाही.

(३) अर्ज मिळाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकडून अर्जदारास परवानगी देण्याचा किंवा फेटाळण्याचा निर्णय, कळविण्यात येईल.

(४) विहिरीचे खोदकाम करण्याची परवानगी, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे विनिर्दिष्ट कालावधीत अर्जदाराने समुचित आकाराच्या कृत्रिम पुनर्भरणाच्या संरचनेचे बांधकाम करण्याच्या शर्तीच्या अधीन असेल.

**सामूहिक सहभागाला चालना देणे.**

**३३.** पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, जिल्हा प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, विहित करण्यात येईल अशा रीतीने, अधिसूचित क्षेत्रात, भूजल स्रोतांचा समन्यायी व कायम विकास, संरक्षण, जलसंधारण, विनियमन आणि व्यवस्थापन या उद्दिष्टांसह, सामूहिक सहभागाला चालना देईल. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, भूजलाच्या सामूहिक मालकी हक्काच्या संकल्पनेला, अल्प आणि अत्यल्प भूधारक यांच्या हक्कांच्या संरक्षणाच्या संकल्पनेला भूजलाचे सर्वेक्षण व भूजल काढण्यास लावण्यात येणारी बंधने आणि अति भूजल काढण्यास प्रतिबंध या गोष्टींना जबाबदार राहील.

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या निर्णयांची व योजनांची अंमलबजावणी.**

**३४.** पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे निर्णय जे विनियामक स्वरूपाचे असतील त्यांची जिल्हा प्राधिकरणाकडून अंमलबजावणी करण्यात येईल. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने, पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था किंवा प्राधिकरणे यांच्या समन्वयाने योजनांची अंमलबजावणी करता येईल. पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या योजनांच्या अंमलबजावणीच्या किंवा त्यांचे निर्णय अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी, कलम २८ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (ज) अन्वये, जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार, पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था यांना असतील.

**वाळू खाणकामाचे विनियमन किंवा प्रतिबंध.**

**३५.** कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, तज्ज्ञ मंडळाशी आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल अशा रीतीने, अधिसूचित क्षेत्रात वाळू खाणकामाचे विनियमन करण्याची किंवा प्रतिबंध करण्याची जिल्हा प्राधिकरणाला शिफारस करील.

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीकरिता वित्तीय स्त्रोत.**

**३६.** (१) अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक असलेला निधी, राज्य शासनाकडून पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीस, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या दराने, भूजलाच्या वापरकर्त्याकडून अर्जाची फी आकारता येईल आणि सेवा आकार गोळा करता येईल आणि तो, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचा वापर करील.

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या कामामधील पारदर्शकता.**

**३७.** पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, विहित केलेल्या रीतीने त्याचा अहवाल प्रसिद्ध करील आणि तो अहवाल, ग्रामसभेला आणि विहित करण्यात येईल अशा इतर संस्थांना सादर करील.

प्रकरण सहा

## लेखे व लेखापरीक्षा

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला अनुदान व आगाऊ रकमा देणे.**

**३८.** (१) राज्य शासन, याबाबतीत केलेल्या कायद्याद्वारे, राज्य विधानमंडळाकडून यथोचितरीत्या विनियोजन केल्यानंतर पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीला, या अधिनियमान्वये तिची कार्ये पार पाडण्यासाठी व तिच्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी, त्याला आवश्यक वाटेल अशी अनुदाने व आगाऊ रकमा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांना उपलब्ध करून देतील आणि सर्व अनुदाने व आगाऊ रकमा या राज्य शासन निर्धारित करील अशा अटी व शर्तीनुसार असतील.

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अंदाजपत्रक.**

**३९.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अंदाजित जमा रकमा व खर्च दाखविणारे पुढील वित्तीय वर्षासाठीचे पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे अंदाजपत्रक प्रत्येक वित्तीय वर्षी विहित केल्याप्रमाणे अशा स्वरूपात व अशा वेळी तयार करील, आणि ते शासनाकडे पाठवील.

**पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे लेखे.**

**४०.** (१) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, योग्य लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि महालेखापालाशी विचारविनिमय करून, शासन विहित करील अशा नमुन्यात, लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) महालेखापाल, त्याने स्वत: विहित केलेल्या कालांतराने, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील किंवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेच्या वेळी लेखापरीक्षा करील, आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात कोणताही खर्च करण्यात आला असल्यास, तो पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती महालेखापालास प्रदान करील.

प्रकरण सात

## भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, तिचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

**मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे, त्यांचा आराखडा तयार करणे आणि त्याची घोषणा करणे.**

**४१.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्यातील मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर त्याच्या सीमांसह, शोधून काढील, त्यांचा आराखडा तयार करील आणि ते घोषित करील.

**प्रभाव क्षेत्राचा आराखडा तयार करणे.**

**४२.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अधिसूचित सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांच्या प्रभाव क्षेत्राचा आराखडा तयार करण्याचे काम प्राधान्याने पार पाडील.

**पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर यांवर आधारित भूजल वापर योजना.**

**४३.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, विहित करण्यात येईल अशा रीतीने, पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर यांवर आधारित भूजल वापर योजना तयार करण्यामध्ये, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व पंचायत यांना साहाय्य करील.

**एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करण्यामध्ये सहाय्य.**

**४४.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणाकरिता एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करण्यामध्ये जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समितीला सहाय्य करील.

**तंत्रविषयक सर्वेक्षण व मदत कार्य.**

**४५.** (१) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, विहित करण्यात येईल अशा रीतीने, राज्य प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था यांनी सोपविल्याप्रमाणे, आवश्यक भूजल शास्त्रीय अभ्यास आणि मदत कार्य पार पाडील.

(२) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये त्यास सोपविण्यात आलेली अन्य कोणतीही कार्ये व कर्तव्ये पार पाडील.

**भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील पंचायत, पंचायत समिती व नागरी स्थानिक संस्था यांना सल्ला देणे.**

**४६.** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, विद्यमान विहिरीकरिता भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणाच्या व्यक्तिगत उपाययोजनांचे संनियंत्रण करणे आणि त्यांना उत्तेजन देणे, क्षेत्राच्या सुरक्षित पाणलोट क्षेत्र स्थितीचे संरक्षण करणे आणि अधिसूचित नसलेल्या क्षेत्रामध्ये साठ मीटरपर्यंत विंधण विहीर किंवा नलिकाकूप यांचे खोदकाम करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला अथवा भूजलाच्या वापरकर्त्याला परवानगी देणे यासाठी अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील पंचायत, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक संस्थांना, तंत्रविषयक सल्ला देईल :

परंतु, या प्रयोजनासाठी, पंचायत, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक संस्था या विहित करण्यात येईल अशा रीतीने क्षेत्राचे जल लेखा व जल अंदाजपत्रक तयार करतील व ठेवतील, भूजल पुनर्भरण आधारित पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर योजना तयार करतील आणि त्याची अंमलबजावणी करतील आणि भूजल वापर योजना तयार करतील आणि अशा विंधण विहिरी व नलिकाकूप यांचे उत्खनन करण्याच्या परवानगीसाठीच्या अर्जांचा विचार करताना, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची भूजल वापर योजना आणि तंत्रविषयक सल्ला विचारात घेतील :

परंतु आणखी असे की, अधिसूचित नसलेल्या क्षेत्रातील विहिरीचे खोदकाम करण्याची कोणतीही परवानगी विहित करण्यात येईल अशा विनिर्दिष्ट कालावधीमध्ये समुचित आकाराच्या कृत्रिम पुनर्भरण संरचना बांधकामाच्या शर्तींच्या अधीन असेल.

प्रकरण आठ

## संकीर्ण

**आदेश बजावणे.** **४७.** या अधिनियमाखालील प्रत्येक आदेश, विहित करण्यात येईल अशा रीतीने बजावण्यात येईल.

**शासनाने निदेश देणे.** **४८.** (१) शासनास, लोकांचे हित असणाऱ्या धोरणविषयक बाबींमध्ये राज्य प्राधिकरणाला, असे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश लेखी देता येतील आणि राज्य प्राधिकरणास, अशा निदेशांचे पालन करणे आणि त्यानुसार कृती करणे बंधनकारक असेल.

(२) जर लोकांचे हित असणाऱ्या धोरणविषयक बाबींशी असा कोणताही निदेश संबंधित आहे किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवला तर त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**राज्य प्राधिकरण व पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती यांचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असणे.** **४९.** हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, काढण्यात आलेले आदेश किंवा अधिसूचना यांच्या तरतुदींन्वये किंवा त्यास अनुसरून, राज्य प्राधिकरणाचा, जिल्हा प्राधिकरणाचा प्रत्येक सदस्य, आणि अशा प्राधिकरणांचा व पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचा कार्यरत असलेला प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थातर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. **१९६० चा ४५.**

**सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.** **५०.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा आदेशांच्या तरतुदींनुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी शासन किंवा राज्य प्राधिकरण वा जिल्हा प्राधिकरण अथवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती किंवा पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा किंवा त्याचा कोणताही सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नुकसान-भरपाईचा दावा करण्यास मनाई.** **५१.** कलम २७ च्या तरतुदींस अधीन राहून कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमांन्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे झालेल्या तिच्या कोणत्याही नुकसानीबद्दल शासनाकडून कोणत्याही नुकसानीची किंवा नुकसानभरपाईची मागणी करण्याचा हक्क असणार नाही.

**अपराध व शास्ती.** **५२.** जो कोणी, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील, किंवा राज्य प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, पंचायत, पंचायत समिती व नागरी स्थानिक संस्था, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि या अधिनियमान्वये कोणतेही अधिकार वापरण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस अडथळा आणील, तर अपराधसिद्धीनंतर त्याला पुढीलप्रमाणे शिक्षा देण्यात येईल :--

(एक) पहिल्या अपराधाकरिता, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा; आणि

(दोन) त्यानंतरच्या अपराधाकरिता, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**५३.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्याबाबतीत, असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे कंपनीचा प्रभार होता आणि जी, कंपनीचे कामकाज चालविण्यास कंपनीस जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल:

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केला असेल, आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हेदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहेत असे मानण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास ते पात्र ठरतील.

**स्पष्टीकरण.--** या कलमाच्या प्रयोजनार्थ,--

(एक) "कंपनी" याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा -- मग तो विधिसंस्थापित असो वा नसो -- समावेश होतो ;

(दोन) भागीदारी संस्थेच्या संदर्भात "संचालक" याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार असा आहे आणि व्यक्तींच्या संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात "संचालक" याचा अर्थ, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

अपराध आपसात मिटविणे.

**५४.** (१) या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासंबंधातील कार्यवाही सुरू होण्यापूर्वी किंवा त्यानंतर, अशा अपराधांचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी, अपराधसिद्धीनंतर अशा अपराधाकरिता जो जबाबदार आहे त्याच्याकडून कलम ५२ मध्ये विनिर्दिष्ट असलेल्या दंडाच्या कमाल रकमेपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम स्वीकारल्यावर जिल्हा प्राधिकाऱ्याद्वारे अपराध आपसात मिटविला जाईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अपराध आपसात मिटविण्यात आल्यानंतर, अशा अपराधाच्या बाबतीत संबंधित व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही चालविण्यात येणार नाही किंवा चालू राहणार नाही आणि त्या अपराधासंबंधात जर त्याच्या विरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणतीही कार्यवाही आधीच चालू असल्यास, ती समाप्त होईल.

अपराधांची दखल व न्याय चौकशी.

**५५.** (१) या अधिनियमाखालील अपराधांबाबत जिल्हा प्राधिकाऱ्याच्या सर्वसाधारण किंवा विशेष संमतीशिवाय खटला दाखल करता येणार नाही.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबाबत महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले न्यायालय न्याय चौकशी करणार नाही.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम आणि त्याखालील करण्यात आलेल्या नियमांखालील शिक्षापात्र अपराध हे दखलपात्र असतील. **१९७४ चा २.**

**अपिले.** **५६.** (१) या अधिनियमाखालील पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती, पंचायत, पंचायत समिती किंवा नागरी स्थानिक संस्था यांनी दिलेला निर्णय, संमत केलेला आदेश, केलेली कार्यवाही यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्याच्यावर कार्यवाही झाल्याच्या किंवा निर्णय किंवा आदेश कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत व विहित करण्यात येईल अशी फी भरल्यावर, असे अपील जिल्हा प्राधिकाऱ्याकडे दाखल करता येईल :

परंतु, अर्जदाराला वेळेत अपील दाखल करण्यास प्रतिबंध करण्यात आला होता याबाबतच्या पुरेशा कारणांमुळे जिल्हा प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास, उक्त साठ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर जिल्हा प्राधिकारी अपील विचारार्थ स्वीकारील.

(२) पोट-कलम (१) अन्वये जिल्हा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने जर व्यथित व्यक्तीचे समाधान झाले नाही तर, तिला निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीत व विहित केलेली फी भरून, जिल्हा प्राधिकाऱ्याच्या आदेशाच्या विरोधात राज्य प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि राज्य प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये अपील प्राप्त झाल्यावर जिल्हा प्राधिकरण किंवा यथास्थिति, राज्य प्राधिकरण, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर शक्य तितक्या त्वरेने, अपील निकालात काढेल.

**नियम करण्याचा शासनाचा अधिकार.** **५७.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्यात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल आणि असा **राजपत्रातील** निर्णय प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून तो नियम, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.** **५८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**निरसन व व्यावृत्ती.** **५९.** (१) महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाकरिता विनियमन) अधिनियम, १९९३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१९९३ चा महा. २८.**

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अधिनियमान्वये किंवा त्यानुसार करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, अशा निरसनापूर्वी त्याच्या संबंधात अंमलात असण्याचे चालू राहील आणि उक्त अधिनियमाच्या निरसनाच्या संबंधात मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ याचे कलम ७ लागू होईल. **१९०४ चा मुंबई १.**

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६